| ८६. | श्री. पुष्पसेन सावंत कृषी महाविद्यालय, वाडीहुमरमळा, डिगस, ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग spsagridigas@gmail.com | ११३०९ | २०२३-२४ पासून सुरु | ७०,००० | डॉ.बासाको कृवि | ६० | ६ | श्री. वाय. एल. फंदारे | ०२३६२-२२९०२२ ८००७९२३१८६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ८७. | कृषी महाविद्यालय, तोंडवली, ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग sesagricollege@gmail.com | ११३१० | २०२३-२४ पासून सुरु | ७०,००० | डॉ.बासाको कृवि | ६० | ६ | डॉ. एम.डी. कोरगावकर | ०२३६७-२४८९३९ ८९७५६१०३८ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| ८८. | जिजामाता महिला कृषी महाविद्यालय, मांडकी पालवण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी gncamp@rediffmail.com | ११३११ | २०२३-२४ पासून सुरु | ७०,००० | डॉ.बासाको कृवि | ६० | ६ | डॉ. एस. एन. चोरगे | ८६००८७९४२६ | आहे (मर्यादित) | आहे (मर्यादित) |
| | **एकूण** | | | | | | **९५१** | | | | |

** भाषिक (गुजर) (MLG-Minority Linguistic Gujar) अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेचे महाविद्यालय.

*** भाषिक (हिंदी) (MLH-Minority Linguistic Hindi) अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेचे महाविद्यालय.

® ही महाविद्यालये भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्याकडून मानांकन प्राप्त आहेत. जे उमेदवार हया महाविद्यालयांव्यतिरिक्त इतर महाविद्यालयांतून पदवी प्राप्त करतील, ते उमेदवार राज्याबाहेरील पदव्युत्तर व आचार्य पदवी शिक्षणासाठी अपात्र असतील.

**$ वरील मुद्दा क्र.२.३ मध्ये कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांच्या दर्शविलेल्या शुल्काबाबत 'शुल्क नियामक प्राधिकरणा'कडून वाढ किंवा बदल होऊ शकतात. ही वाढ/बदल विद्यार्थ्यांवर आणि संस्थांवर बंधनकारक असेल.**

**टीपः-**

(१) गुणवत्ता, आरक्षण आणि संबंधित विद्यापीठ / महाविद्यालय यांनी ठरविलेल्या प्रमाणकानुसार वसतीगृह सुविधा पुरविली जाईल.

(२) अल्पसंख्यांक संस्थांच्या महाविद्यालयातील ५१ टक्के जागा संबंधित अल्पसंख्यांकाकरिता आरक्षित असतील. सदरच्या ५१ टक्के जागा व उर्वरित ४९ टक्के जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे भरण्यात येतील.

(३) महाविद्यालयांची प्रवेश क्षमता कमी किंवा अधिक करण्याचे अधिकार कृषी परिषद राखून ठेवत आहे.

(४) उक्त महाविद्यालयांपैकी कोणत्याही महाविद्यालयामध्ये कोणत्याहीवेळी प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्याचे अधिकार राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष / कृषी परिषद / संबंधित कृषी विद्यापीठ राखून ठेवत आहे.

(५) शासकीय महाविद्यालयांकडून जे शुल्क (जसे, गुणपत्रिका शुल्क, परीक्षा शुल्क इत्यादी) संबंधित कृषी विद्यापीठांकडे जमा करण्यात येते, ते शुल्क विना अनुदानित महाविद्यालयांनी, शैक्षणिक शुल्कातून संबंधित कृषी विद्यापीठाकडे जमा करावे.

(६) विना अनुदानित महाविद्यालयांनी सदर शुल्काव्यतिरिक्त इतर कोणतेही शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येऊ नये.

(७) विना अनुदानित महाविद्यालयांनी वार्षिक शुल्क दोन सत्रांमध्ये समप्रमाणात विभागून आकारण्यात यावे.

(८) विना अनुदानित महाविद्यालयांचे वसतीगृह शुल्क हे मुद्दा क्र. १८.१ येथे नमूद केलेल्या शासकीय महाविद्यालयांच्या वसतीगृह शुल्काप्रमाणेच राहील. सदर शुल्क वरील शुल्काव्यतिरिक्त असेल.

(९) विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजूर न झाल्यास विद्यार्थ्याने पूर्ण शुल्क भरणे बंधनकारक राहील.

## ३. उमेदवारांसाठी सूचना :

३.१ **प्रवेशासाठी विहीत नमुन्यातील अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारांनी माहितीपत्रक आणि प्रवेश अर्ज यांचे काळजीपूर्वक वाचन करावे.**

(i) प्रत्येक अर्जदारास **फक्त एकच प्रवेश अर्ज** agripug2024.mahacet.org या संकेतस्थळावर **'ऑन लाईन'** पध्दतीने भरता येईल. एका उमेदवारास एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज दाखल करता येणार नाहीत. त्यामुळे प्रवेश अर्जामध्ये भरण्यात आलेली पूर्ण माहिती बरोबर असल्याची खात्री केल्यानंतरच प्रवेश अर्ज दाखल (Submit) करावा. यासाठी agripug2024.mahacet.org या संकेतस्थळाद्वारे प्रवेश अर्ज दाखल करता येईल.

(ii) **प्रवेश अर्जाची प्रत किंवा इतर कोणतीही कागदपत्रे टपालाने / कुरीअरने किंवा हातबटवडयाने सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, कृषी परिषद किंवा कृषी विद्यापीठ यापैकी कोठेही पाठवू नयेत.**

(iii) **संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी, उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या मूळप्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.**

(iv) **ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी प्रवेश अर्ज दाखल करतांना रू. १०००/- (सामाजिक, आर्थिक दुर्बल घटक, दिव्यांग (अपंग) व अनाथ प्रवर्गाकरिता रू.८००/-) शुल्क ऑनलाईन पध्दतीने अदा करावे लागेल.**

३.२ **उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या मूळ कागदपत्रांच्या मूळ प्रती स्कॅन करून पुढील क्रमाने त्याच्या लॉग-इनद्वारे संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.**

(अे) **अर्हता परीक्षेचे (कृषी तंत्रनिकेतन पदविका- इंग्रजी माध्यम) गुणपत्रक / श्रेणी पत्रक.**

(बी) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे (एस्एस्सी- इ.१० वी) गुणपत्रक किंवा गुणविवरणपत्र. (गुणपत्रकामध्ये टक्केवारी नमूद नसल्यास, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीने गुणपत्रकातील टक्केवारीचे पत्र जोडावे अन्यथा संबंधित श्रेणीतील किमान गुण विचारात घेण्यात येतील.)

(सी) (i) ज्या कृषी तंत्रनिकेतनामध्ये शेवटची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे, ते कृषी तंत्रनिकेतन **सोडल्याचा दाखला किंवा इतर काही अभ्यासक्रमामध्ये उमेदवार प्रवेशित असल्यास त्या महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.**

(ii) मागील शैक्षणिक वर्षात राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवी शिक्षण घेत असलेल्या कृषी तंत्रनिकेतन पदविकाधारक उमेदवाराने द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी पुनश्च अर्ज केल्यास, **चालू शैक्षणिक वर्षासाठी द्वितीय वर्षात प्रवेश घेण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षापूर्वी प्रवेश घेतलेल्या संबंधित महाविद्यालयाचे 'बोनाफाईड प्रमाणपत्र'.**

(डी) महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, कृषी तंत्रनिकेतन / महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.

(ई) **सन २०२२-२३ किंवा २०२३-२४ या वर्षातील तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र**. या प्रमाणपत्राचा नमुना **परिशिष्ट 'अे'** येथे जोडला आहे. उमेदवार किंवा त्याचे / तिचे आई-वडील अथवा आजी/आजोबा (वडिलांचे आई-वडील) हे शेतजमीनधारक किंवा कूळ असून त्या जमिनीवरील शेतीव्दारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन आहे, असे या प्रमाणपत्रामध्ये नमूद करणे आवश्यक आहे **किंवा तहसीलदार / नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र.**

(एफ्) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र.

(जी) मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. ११२३४-४८/२०१७ संदर्भात दिलेल्या आदेशास अनुसरून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्गीय जाती, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवारांचे जात / जमाती पडताळणी प्रमाणपत्र. (ज्या उमेदवारांनी जात पडताळणी समितीकडे जात / जमाती प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे, अशा उमेदवारांनी जात

/ जमाती पडताळणी प्रमाणपत्राच्या जागी तसा अर्ज केल्याबाबतची पावती अपलोड करावी.)

(एच) **विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड, इतर मागासवर्गीय जाती, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील उमेदवारांचे दिनांक ३१ मार्च,२०२५ पर्यंत ग्राह्य असलेले सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले 'उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (Non Creamy Layer)' प्रमाणपत्र.** (ज्या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेसाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज सादर केलेला आहे, अशा उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राच्या जागी तसा अर्ज केल्याबाबतची पावती अपलोड करावी.)

(आय) **खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या जागांवरील प्रवेशासाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/ प्र.क्र.३१ /१६-अ, दि.३१/५/२०२१ अन्वये विहित केलेल्या 'परिशिष्ट अ' मधील नमुन्यातील प्रमाणपत्र. सदर प्रमाणपत्र चालू शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता ग्राह्य असावे. या प्रमाणपत्राचा विहित नमुना शीघ्र संदर्भासाठी परिशिष्ट 'बी' येथे देण्यात आलेला आहे.** (ज्या उमेदवारांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र_मिळणेसाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज सादर केलेला आहे, अशा उमेदवारांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रमाणपत्राच्या जागी तसा अर्ज केल्याबाबतची पावती अपलोड करावी.)

**उक्त मुद्दे क्र. 'जी', 'एच', 'आय' बाबत विशेष सूचनाः-**

प्रमाणपत्राच्या जागी, 'प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केल्याबाबतची पावती' अपलोड केलेल्या उमेदवारांना संबंधित प्रवर्गात ग्राह्य धरून केंद्रीभूत प्रवेश वाटप फेऱ्या रा बविण्यात येतील. अशा उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश वाटप फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झाल्यास, त्या उमेदवारांनी पावतीशी संबंधित प्रमाणपत्र / प्रमाणपत्रे दि. २४/०७/२०२४ ते २६/०७/२०२४ या कालावधीत उमेदवाराच्या लॉगइनद्वारे अपलोड करणे तसेच संबंधित महाविद्यालयाकडे सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा संबंधित महाविद्यालय सदर प्रवेशाचे वाटप रद्द करेल आणि असे उमेदवार पुढील प्रवेश प्रक्रियेंतर्गत खुल्या प्रवर्गात ग्राह्य धरण्यात येतील.

(जे) महाराष्ट्र राज्यातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी किंवा शासनाने प्राधिकृत केलेला अधिकारी (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) यांनी, उमेदवार / वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्याच्या/तिच्या वडिलांची / पालकांची किंवा आजोबांची **शेतजमीन महाराष्ट्रातील** कृषी विद्यापीठे/ पाटबंधारे/ वीज /संरक्षण **प्रकल्पासाठी संपादित केलेली / झालेली आहे, असे प्रमाणपत्र.** सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या **प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्याला द्यावयाचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.**

(के) अर्जदाराच्या आई / वडिलांचे **स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे मा. पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र**. स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा / मुलगी किंवा त्यांचा मुलगा / मुलगी यांना या प्रमाणपत्राचा फायदा मिळेल; परंतु अशा परिस्थितीत '**उमेदवार** स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा/मुलीचा मुलगा/मुलगी आहे' **अशा आशयाचे स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती / पत्नीचे रु.१००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र असणे आवश्यक**

(एल) **उमेदवाराचे वडील, सैनिक असल्यास** तशा आशयाचे **जिल्हा सैनिक बोर्ड किंवा संबंधित तुकडीचा प्रमुख सेनाधिकारी यांचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र** अथवा **डिस्चार्ज प्रमाणपत्र.**

(एम) **सेवेत असणा-या उमेदवारांसाठी संबंधित नियुक्ती अधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र'.**

(एन) शारीरिकदृष्टया दिव्यांग प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने **प्राधिकृत अधिका-याचे** (जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळ) **दिव्यांगाबद्दलचे प्रमाणपत्र**. (विकलांगतेची टक्केवारी ४० टक्क्यांपेक्षा कमी नसावी.)

(ओ) अनाथ प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराने, संबंधित विभागाचे विभागीय उपायुक्त, महिला व बालविकास यांचे स्वाक्षरीचे छापील लेटर हेडवरील विहित नमुन्यातील 'अनाथ प्रमाणपत्र''

(पी) अल्पसंख्यांक उमेदवारांचे धार्मिक / भाषिक स्वयंघोषणा प्रमाणपत्र. (परिशिष्ट-'**सी** ').

**स्कॅन करून अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल. अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'डी' येथील नमुन्यात स्वघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड करावे.**

३.३ **सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेले अंतिम दिनांक किंवा त्यापूर्वी संकेतस्थळावर अपलोड केलेला प्रवेश अर्जच प्रवेशासाठी ग्राह्य धरला जाईल.**

३.४ **अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेश प्रक्रिया-**

अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांच्या महाविद्यालयांमधील ५१ टक्के जागा संबंधित अल्पसंख्यांक भाषिक किंवा धार्मिक समाजाकरिता आरक्षित ठेवण्यात येतील. त्या समाजातील, राज्याच्या उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे गुणवत्तेच्या आधारे अल्पसंख्यांकासाठीच्या राखीव जागाचे वाटप करण्यात येईल. यानंतरही जागा शिल्लक राहिल्या तर अशा जागांचे वाटप महाराष्ट्र राज्य उमेदवारी उमेदवारांना गुणवत्तेच्या आधारे करण्यात येईल.

३.५ **गुणवत्ता यादी व प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता,--**

(क) प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर प्रवेश नियामक प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या सूचनानुसार प्रत्येक विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थेने, शासकीय महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेशास, प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करावी.

(ख) जर एखाद्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेने लागोपाठच्या तीन वर्षाच्या कालावधीत तिच्या मंजूर प्रवेश क्षमतेच्या किमान एकावन्न टक्के प्रवेश संबंधित अल्पसंख्यांक

प्रवर्गातील व्यक्तींमधून देण्यात कसूर केली तर, सक्षम प्राधिकारी, त्याबाबतची माहिती विभागास कळवतील.

३.६ **खालीलपैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्जाचा विचार न करता तो आपोआपच रद्द समजण्यात येईल.**

**(क) किमान वय किंवा किमान एकूण गुणांचे निकष पूर्ण करीत नसल्यास.**

**(ख) सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा सोडल्याचे / कृषी तंत्रनिकेतन सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिकाऱ्याकडील जन्म दाखल्याची प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.**

(ग) **उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र व स्वतःची स्वाक्षरी** संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.

(घ) **अर्हता परीक्षेचे गुणपत्रक / श्रेणीपत्रकाच्या मूळ प्रती संकेतस्थळावर अपलोड केल्या नसल्यास.**

(च) **कृषी तंत्रनिकेतन सोडल्याच्या दाखल्याची / बोनाफाईड प्रमाणपत्राची मूळ प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास,** (बोनाफाईड प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश दिला असल्यास मूळ महाविद्यालय सोडल्याचा दाखला प्रवेश घेतल्यापासून ३ महिन्यांच्या आत सादर करणे बंधनकारक राहील.)

(छ) सेवेत असणा-या उमेदवाराने संबंधित **नियुक्ती प्राधिकाऱ्याचे 'ना हरकत प्रमाणपत्र' संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

**(ज) प्रवेश अर्जाचे विहित शुल्क न भरल्यास ।.**

**(झ) संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

३.७ **गुणांच्या बाबतीत बरोबरी झाल्यास उमेदवारांचा गुणवत्ताक्रम (Merit Position) ठरविण्यासाठी अनुक्रमे खालील मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करण्यात येईल.**

(अ) कमीत कमी प्रयत्नांमध्ये कृषी तंत्रनिकेतन परीक्षा उत्तीर्ण.

(ब) इयत्ता १० वी मध्ये उच्चतम गुणांची टक्केवारी.

(क) वयाने मोठा असलेला उमेदवार.

(ड) प्रथम ऑनलाईन प्रवेश अर्ज क्रमांक

३.८ **प्रवेश अर्ज व त्यासोबतची संबंधित कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड केल्यानंतर टपालाने / कुरीअरने / हातबटवडयाने कोणतीही <u>अतिरिक्त कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.</u>**

३.९ **उमेदवारांनी त्यांना पाहिजे असलेल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रत्येक प्रवेश फेरीकरिता स्वतंत्रपणे महाविद्यालयाचे प्राधान्यक्रम द्यावेत. त्यासाठी संबंधित महाविद्यालयाच्या सांकेतांकांचा वापर करावा. याविषयी खालील बाबी विचारात घ्याव्यात.**

(क) प्रवेश फ्रीज न केलेल्या उमेदवारास किंवा ज्यांना प्रवेशाचे वाटप झालेले नाही, अशा उमेदवारांना पुढील प्रवेश फेरीसाठी नव्याने महाविद्यालयाचे पसंतीक्रम देता येतील. (पहिल्या पसंतीक्रमाच्या महाविद्यालयात प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास सदरची बाब लागू असणार नाही.)

(ख) ज्या उमेदवारास प्रवेशाचे वाटप झालेले नाही, अशा उमेदवाराने पुढील प्रवेश वाटप फेरीकरिता महाविद्यालयाचे पसंतीक्रम न दिल्यास लगतच्या मागील प्रवेश वाटप फेरीमध्ये दिलेले महाविद्यालयाचे पसंतीक्रमच विचारात घेण्यात येतील.

(ग) ज्या उमेदवारास मागील प्रवेश वाटप फेरीमध्ये प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशा उमेदवारास पुढील प्रवेश फेरीमध्ये प्रविष्ठ व्हावयाचे असल्यास मागील प्रवेश वाटप फेरीतील प्रवेश फ्रीज करू नये व पुढील प्रवेश फेरीसाठी नव्याने महाविद्यालयाचे पसंतीक्रम द्यावेत. (फ्लोट पर्याय निवडलेल्या किंवा पहिल्या पसंतीक्रमाच्या महाविद्यालयात प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास सदरची बाब लागू असणार नाही)

(घ) ज्या उमेदवारास मागील प्रवेश वाटप फेरीमध्ये प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशा उमेदवाराने प्रवेश फ्रीज केला नसल्यास आणि पुढील प्रवेश फेरीसाठी नव्याने महाविद्यालयाचे पसंतीक्रम सुध्दा दिले नसल्यास त्यास पुढील प्रवेश फेरीमध्ये

प्रविष्ठ करण्यात येणार नाही. (पहिल्या पसंतीक्रमाच्या महाविद्यालयात प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास सदरची बाब लागू असणार नाही.)

(च) प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवाराने प्रवेश फ्रीज न केल्यास आणि पुढील प्रवेश फेरीसाठी नव्याने महाविद्यालयाचे पसंतीक्रम दिल्यास फ्रीज न केलेले महाविद्यालय नाकारले असे समजण्यात येईल. नाकारलेल्या महाविद्यालयाचा पसंतीक्रम पुन्हा पुढील प्रवेशफेरीमध्ये देता येईल. (पहिल्या पसंतीक्रमाच्या महाविद्यालयात प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास सदरची बाब लागू असणार नाही.)

३.१० (क) **उमेदवाराने सर्व रकान्यांमध्ये अचूक माहिती द्यावी.**

(ख) उमेदवाराने भरलेल्या अर्जामध्ये कोणत्याही प्रकारची **<u>त्रुटी राहिल्यामुळे उमेदवाराची गुणवत्ता घसरल्यास,</u> त्याबाबत सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष किंवा कृषी परिषद जबाबदार राहणार नाही.**

३.११ अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर **गुणवत्ता यादीतील स्थान, उमेदवाराने दिलेले विकल्प, लागू असलेले आरक्षण आणि उपलब्ध जागा विचारात घेऊन प्रवेशाचे वाटप करण्यात येईल.**

३.१२ उमेदवाराने दिलेल्या **विकल्पानुसार प्रथमतः राज्यस्तरावरील ('एम' कोटा) उपलब्ध जागांमधून प्रवेशासाठी विचार केला जाईल. त्यानंतर कृषी विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) जागांवरील प्रवेशाबाबत विचार करण्यात येईल.**

३.१३ प्रवेशासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांची **'एम्'** कोटा व **'यु'** कोटयातील यादी प्रवेश वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांकांना संकेतस्थळांवर प्रसिध्द केली जाईल.

३.१४ प्रवेशोच्छुक उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना **परिशिष्ट 'ई'** मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

३.१५ शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०११/(१०३)/११)/मशि-३, दि.१८/४/२०११ नुसार उमेदवाराने प्रवेश घेतेवेळी महाविद्यालयाकडे स्वच्छताविषयक बाबींसबंधी **<u>परिशिष्ट 'एफ'</u>** मध्ये माहिती देणे अनिवार्य आहे.

३.१६ शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण-१५१७/प्र.क्र.१८५/६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून प्रवेश घेतेवेळी संबंधित महाविद्यालयाकडे जमा करावे.

## ४. प्रवेश कार्यपध्दती :

४.१ उमेदवाराने प्रवेश प्रक्रियेसंबंधी माहिती पुस्तिकेत दिलेला सर्व मजकूर काळजीपूर्वक वाचावा.

४.२ राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, राज्यातील कृषी विद्यापीठातील कृषी पदवी अभ्यासक्रमाची थेट द्वितीय वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबवील.

४.३ **कृषी तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रमाचे गुण विचारात घेऊन प्रवेशाची गुणवत्ता निश्चित करण्यात येईल.**

४.४ जागांचे वाटप खालीलप्रमाणे करण्यात येईल.

-- **प्रथम ३० टक्के जागा महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांसाठी खुल्या असतील ('एम्' कोटा)**
**आणि**

-- **नंतर ७० टक्के जागा, हया, उमेदवार ज्या कृषी विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील कृषी तंत्रनिकेतनातून अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाला असेल, अशा उमेदवारांसाठी असतील ('यु' कोटा)**

कृषी महाविद्यालय, सोनापूर, गडचिरोली व कृषी महाविद्यालय, नंदूरबार येथे ८० टक्के जागा अनुसूचित जमाती करिता राखीव असल्याने प्रथमतः अनुसूचित जमातींकरिता ८० टक्के जागा निश्चित करून उर्वरित जागांचे वरीलप्रमाणे वाटप करण्यात येईल.

अल्पसंख्यांक संस्थांच्या महाविद्यालयातील ५१ टक्के जागा संबंधित अल्पसंख्यांकाकरिता आरक्षित असतील आणि उर्वरित ४९ टक्के जागांचे वरीलप्रमाणे ३० टक्के महाराष्ट्र कोटा आणि ७० टक्के विद्यापीठ कोटा याप्रमाणे वाटप करण्यात येईल.

४.५ पदवी अभ्यासक्रमाच्या थेट द्वितीय वर्षातील सर्व प्रवेश **गुणवत्तेनुसार आणि तात्पुरत्या स्वरुपाचे असतील.**

४.६ **संकेतस्थळांवर सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल**. उमेदवार या संकेतस्थळावर गुणवत्ता यादी पाहू शकतील. **उमेदवारांना टपाल किंवा दूरध्वनीद्वारे त्यांच्या गुणवत्तेबाबत कळविले जाणार नाही.**

४.७ गुणवत्ता यादीबाबत तक्रार असलेल्या अर्जदारांनी, प्रवेश कार्यक्रमामध्ये नमूद केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी त्यांच्या तक्रारी, प्रवेश अर्ज नोंदणीच्यावेळी त्यांना पुरविण्यात आलेल्या 'लॉगइन् आय्डी' व 'पासवर्ड'च्या आधारे 'ऑन लाईन' सादर कराव्यात. **या मुदतीत उमेदवाराचा तक्रार अर्ज प्राप्त न झाल्यास त्याची/तिची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

४.८ **प्रवेश वाटपाची कार्यपध्दती:-**

शासन निर्णय, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मध्ये नमूद केलेले सामाजिक व विशेष आरक्षण तसेच सदर पुस्तिकेतील अ.क्र. ५ येथील आरक्षण विचारात घेऊन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेंतर्गत (कॅप) येणाऱ्या जागांचे वाटप / आरक्षणाचा लाभ देण्याचा प्राधान्यक्रम व रिक्त जागांच्या रूपांतरणाची कार्यपध्दती सदर शासन निर्णयामधील परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२ नुसार अवंलंबिण्यात येईल. अशाप्रकारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान (कॅप) जागेचे वाटप झालेले असल्यास, जागा स्वीकारण्यासंदर्भात, उमेदवाराला खाली तरतूद केल्याप्रमाणे जागा वाटपाच्या नंतरच्या फेरीसाठी (फेऱ्यांसाठी), महाविद्यालयाकरिता फ्रीझ, फ्लोट, जागा वाटप नाकारणे या विकल्पांची निवड करून प्रवेशविषयक प्रक्रिया करता येईल.

(क) **फ्रीझः** उमेदवार त्यांना देऊ केलेली जागा स्वीकारतील आणि त्यांना जागा वाटपाच्या पुढील कोणत्याही फेऱ्यांमध्ये सहभागी होण्याची इच्छा असणार नाही, अशा उमेदवारांचा नंतरच्या प्रवेश फेऱ्यांमध्ये विचार केला जाणार नाही;

(ख) **फ्लोटः** उमेदवार त्यांना देऊ करण्यात आलेली जागा स्वीकारतील आणि वरच्या पसंतीक्रमाच्या इतर कोणत्याही महाविद्यालयामध्ये प्रवेश देऊ करण्यात आला तर, तो स्वीकारतील असा निर्देश करतील. अन्यथा त्यांनी सध्या स्वीकारलेल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश स्वीकारतील, अशा उमेदवारांना दुसऱ्या प्रवेश वाटप फेरीच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट केले जाईल. फ्लोट हा विकल्प तिसऱ्या फेरीमध्ये वाटप करावयाच्या जागांसाठी उपलब्ध असणार नाही. (म्हणजेच केवळ पहिल्या वाटप फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप केलेल्या परंतु पहिला विकल्प प्राप्त न झालेल्या उमेदवारांसाठीच फ्लोट पर्याय उपलब्ध असेल.);

(ग) ज्या उमेदवारांनी फ्लोट हा पर्याय निवडलेला असेल आणि ज्यांना, दुसऱ्या प्रवेश वाटप फेरीद्वारे वरच्या पसंतीक्रमाचे त्यांच्या निवडीचे महाविद्यालय मिळाले असेल, अशा वेळी त्या उमेदवारांनी अगोदरच्या फेरीमध्ये स्वीकारलेले महाविद्यालय ते आपोआप गमावतील.

तसेच फ्लोट पर्याय निवडलेल्या उमेदवारांनी दुसऱ्या प्रवेश वाटप फेरीसाठी नव्याने पसंतीक्रम दिल्यास त्यांचे पहिल्या प्रवेश फेरीच्यावेळी दिलेले महाविद्यालयांचे पसंतीक्रम विचारात घेतले जाणार नाहीत आणि नवीन पसंतीक्रमामधील कोणत्याही महाविद्यालयाचे वाटप झाल्यास अगोदरच्या फेरीमध्ये स्वीकारलेले महाविद्यालय ते आपोआप गमावतील;

(घ) ज्या उमेदवारांना त्यांच्या पहिल्या पसंतीक्रमाचा प्रवेश देऊ करण्यात आला आहे, अशा उमेदवारांना फ्लोट हा पर्याय उपलब्ध असणार नाही. त्यांना पहिल्या पसंतीक्रमास प्रवेश घेणे अनिवार्य असेल.

(च) पहिला पसंतीक्रम मिळालेले / फ्रीझ किंवा फ्लोट विकल्पाची निवड करू इच्छिणारे उमेदवार, लॉगइनद्वारे प्रवेश वाटप पत्र प्राप्त करतील आणि प्रवेश वाटप पत्रावर नमूद केलेल्या मुदतीत, सर्व मूळ कागदपत्रे घेऊन प्रवेशाचे वाटप केलेल्या महाविद्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपस्थित राहतील. ज्या धर्तीवर प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशी सर्व कागदपत्रे तपासून ते बरोबर असल्याची महाविद्यालयाची खातरजमा झाल्यास महाविद्यालय संकेतस्थळावर कागदपत्रे योग्य असल्याची नोंद करेल व मूळ कागदपत्रे उमेदवारास परत करून उमेदवाराकडून सदर कागदपत्राच्या छायाप्रती ठेवून घेईल.

याचबरोबर असेही, प्रवेश अर्जातील माहितीनुसार **इतरही कागदपत्रे तपासून** ती माहितीसुध्दा बरोबर असल्याची खातरजमा महाविद्यालयाने करावी. माहिती बरोबर नसल्यास त्रुटीविषयक माहितीची नोंद महाविद्यालयाच्या लॉगइन मध्ये करावी. त्यानुसार प्रवेश अर्जातील इतर माहिती सुधारीत करण्यात येईल.

(छ) प्रवेशाच्या वाटपाशी संबंधित कागदपत्रे योग्य असल्याची नोंद महाविद्यालयाने संकेतस्थळावर केल्यानंतर फ्रीझ / फ्लोट पर्यायाची निवड करू इच्छिणाऱ्या उमेदवाराने त्याच्या लॉगइनद्वारे प्रथम रू.१०००/- 'जागा स्वीकृती शुल्क' जमा करावे. यानंतरच उमेदवारास त्याच्या लॉगइनमध्ये फ्रीझ / फ्लोट पर्याय उपलब्ध होतील व उमेदवारास यापैकी एका पर्यायाची निवड करता येईल. जागा स्वीकृती शुल्क ना परतावा असेल.

(ज) पहिल्या प्रवेश वाटप फेरीमध्ये फ्लोट पर्याय स्वीकारल्यामुळे दुसऱ्या प्रवेश वाटप फेरीद्वारे उमेदवारास इतर महाविद्यालयात प्रवेशाचे वाटप झाल्यास, उमेदवाराने त्याच्या लॉगइनद्वारे प्रवेश वाटप पत्राची केवळ प्रत प्राप्त करावी. वरील (च) येथे नमूद केलेली कागदपत्रे तपासण्याची प्रक्रिया आणि (छ) येथे नमूद केलेली शुल्क भरण्याची प्रक्रिया पुनश्च करू नये.

(झ) महाविद्यालयास, **प्रवेश वाटपाशी संबंधित** कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास, महाविद्यालय त्यांच्या लॉगइनद्वारे संकेतस्थळावर त्रुटीची नोंद करून प्रवेश वाटप रद्द करेल. महाविद्यालयाने संकेतस्थळावर केलेल्या नोंदीनुसार प्रवेश अर्जातील माहिती सुधारीत

करण्यात येईल. सुधारीत माहिती / गुणवत्तेनुसार उमेदवार पुढील प्रवेश वाटप प्रक्रियेमध्ये समाविष्ट होईल.

(प) प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारांपैकी पहिल्या पसंतीक्रमाचा प्रवेश देऊ केलेले उमेदवार वगळता, इतर जे उमेदवार, फ्रीझ, फ्लोट हे विकल्प देण्यास इच्छुक नसतील, त्या उमेदवारांना, जागेचे वाटप नाकारता येईल. त्यासाठी त्यांनी त्यांच्या लॉगइनमध्ये प्रवेश नाकारत असल्याची नोंद करावी किंवा पुढील प्रवेश फेरीसाठी नव्याने महाविद्यालयाचे पसंतीक्रम द्यावेत.

(फ) जागेचे वाटप झालेल्या उमेदवाराने, वरील (च), (छ) किंवा (प) नुसार प्रक्रिया न केल्यास व पुढील ऑनलाईन प्रवेश वाटप फेऱ्यांसाठी महाविद्यालयांचे पसंतीक्रम न दिल्यास अशा उमेदवारास पुढील ऑनलाईन प्रवेश वाटप फेरीच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही.

(ब) ऑनलाईन प्रवेश फेऱ्याद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवाराने फ्रीझ / फ्लोटविषयक प्रक्रिया केल्यानंतर, वेळापत्रकात नमूद केलेल्या कालावधीत संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क भरावयाचे आहे. असे न केल्यास उमेदवारास वाटप केलेली जागा रिक्त समजून सदरची जागा 'केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी'द्वारे भरण्यात येईल.

## ४.९ **महाविद्यालयामध्ये उपस्थित राहून प्रवेश कायम करणे-**

केंद्रीभूत ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे (कॅप) मिळालेला प्रवेश **कायम कर**ण्याकरिता, उमेदवाराने त्यास वाटप केलेल्या महाविद्यालयामध्ये वेळापत्रकात नमूद केलेल्या कालावधीत उपस्थित राहून आवश्यक ती मूळ कागदपत्रे आणि प्रथम सत्राचे आवश्यक ते शैक्षणिक शुल्क महाविद्यालयाकडे जमा करावे. याबाबत महाविद्यालयाने, उमेदवारास रितसर पावती द्यावी.

## ४.१० **केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीद्वारे प्रवेश घेणे:-**

केंद्रीभूत ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या / झालेल्या जागा भरण्यासाठी **'परिशिष्ट जी'** येथे नमूद करण्यात आलेल्या 'प्रवेश प्रक्रिया केंद्रावर', **'परिशिष्ट एच '** येथे नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार 'केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी' राबविण्यात येईल.

४.११ **महाविद्यालयनिहाय प्रवेश फेरीद्वारे प्रवेश घेणे:-**

'केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी' नंतर रिक्त असलेल्या जागा महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील. सदरील प्रवेश फेरी संबंधित महाविद्यालयस्तरावर राबविण्यात येईल. महविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीची कार्यपध्दती **'परिशिष्ट आय'** येथे विशद करण्यात आलेली आहे.

४.१२ **प्रवेशाबाबत सर्वसाधारण सूचना:-**

(क) **उमेदवाराने त्याचा 'लॉग इन आय्‌डी' व 'पासवर्ड' वापरून संकेतस्थळावरून त्याला देण्यात येणाऱ्या तात्पुरत्या प्रवेश वाटप पत्राची मुद्रित प्रत प्राप्त करून घेऊन प्रवेश दिलेल्या महाविद्यालयात स्वतः सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रतींसह विहित दिनांकास अथवा त्यापूर्वी उपस्थित रहावे. गंभीर वैद्यकीय कारणास्तव उमेदवार उपस्थित राहू शकत नसल्यास परिशिष्ट- 'जे' येथील प्राधिकार पत्राप्रमाणे उपस्थिती नोंदवावी.**

(ख) **प्रवेशानंतर कोणत्याही वेळी, उमेदवाराने खोटी माहिती पुरवून प्रवेश घेतला आहे, असे आढळून आल्यास असा प्रवेश विद्यापीठ रद्द करील.**

(ग) प्रवेश फेऱ्यांच्या दरम्यान किंवा प्रवेशानंतर कोणत्याही वेळी संगणकप्रणालीमधील तांत्रिक बिघाडामुळे किंवा इतर कोणत्याही चुकीमुळे प्रवेश झाला असे आढळून आल्यास अशा उमेदवाराचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

(घ) **उमेदवाराचा प्रवर्ग आणि / किंवा अतिरिक्त दिलेले गुण चुकीचे दर्शविले गेले असल्याचे,** प्रवेश घेतेवेळी मूळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांच्या **छाननीच्या वेळी निदर्शनास आल्यास, असा उमेदवार प्रवेश मिळण्यास पात्र ठरणार नाही.**

(च) सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य हे याबाबतची वस्तुस्थिती त्यांच्या लॉगइनद्वारे संकेतस्थळावर नोंदवतील. त्यानुसार अंतिम यादी पुन्हा सुधारित करण्यात येईल आणि सदर उमेदवार त्याच्या सुधारित **गुणानुक्रमानुसार पुढील प्रवेश फेरीद्वारे प्रवेशास पात्र राहील.**

(छ) एखाद्या उमेदवाराला प्रवेश वाटपाबाबत तक्रार करायची असल्यास, **संबंधित प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीतच** आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्याकडे

उमेदवार तक्रार अर्ज दाखल करू शकेल. अशा तक्रारीबाबत तात्काळ शहानिशा करून यथायोग्य कार्यवाही करण्यास आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष सक्षम असतील.

(ज) पदवी अभ्यासक्रमासाठी घेतलेल्या प्रवेशामध्ये उमेदवार विद्यापीठ / महाविद्यालय / अभ्यासक्रम यामध्ये कोणताही बदल करण्यास पात्र राहणार नाही.

(झ) उमेदवाराचा दुर्लक्षितपणा, दिरंगाई, कोणत्याही प्रकारचे तांत्रिक बिघाड किंवा त्याच्या इतर खाजगी कारणांमुळे तो प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत **कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

(प) प्रवेश प्रक्रियेसंबंधीची तसेच राज्यस्तरीय ('एम' कोटा) व कृषी विद्यापीठस्तरीय ('यु' कोटा) ची गुणवत्ता यादी आणि प्रवेश फेऱ्यांप्रमाणे प्रवेशासंबंधीची सद्यस्थिती याबाबतची माहिती संकेतस्थळांवर उपलब्ध राहील.

(फ) महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यासाठी महत्वाच्या सूचना **परिशिष्ट 'के'** येथे दिलेल्या आहेत.

४.१३ **प्रवेश रद्द करणे-**

(क) ऑनलाईन प्रवेश फेऱ्याद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवाराने वेळापत्रकात नमूद केलेल्या कालावधीत संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क भरल्यानंतर, प्रवेश रद्द करण्याची सुविधा उमेदवाराच्या लॉगइनमध्ये उपलब्ध असेल.

(ख) उमेदवार प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करील आणि प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या प्रणालीनिर्मित अर्जाची स्वाक्षरीत प्रत संस्थेला सादर करील.

(ग) उमेदवाराकडून प्रवेश रद्द करण्याबाबत स्वाक्षरीत लेखी विनंती अर्ज प्राप्त झाल्यानंतर, संस्था तात्काळ ऑनलाईन पध्दतीने प्रवेश रद्द करील आणि महाविद्यालयाच्या लॉगइनमधून प्रवेश रद्द केल्याबाबत संगणकीय (ऑनलाईन) पोच तयार करील आणि उमेदवाराला स्वाक्षरीत प्रत देईल;

(घ) प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास, महाविद्यालय, विद्यार्थ्याकडून **प्रवेश प्रक्रिया शुल्कापोटी कमाल रू.१०००/- रक्कम कपात करेल.**

(च) **प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास वर्ग सुरु झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क** (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून **वसूल करण्यात येईल.**

(छ) वर्ग सुरु झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्याने नोंदणी करून प्रवेश रद्द केल्यास, **नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करून दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.**

## ५. राखीव जागांचा तपशील.

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ मधील तरतुदी, तसेच वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे निर्देशित केल्याप्रमाणे विशिष्ट जागा, महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत-

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती / नवबौध्द (एस्सी) | १३ |
| (२) | अनुसूचित जमाती (एस्टी ) | ०७ |
| (३) | विमुक्त जाती (अ) (व्हीजे -ए) (१४ व इतर) | ०३ |
| (४) | भटक्या जमाती (ब) (एन्टी-बी) (१९९० पूर्वीच्या सूचीप्रमाणे २८ व इतर) | २.५ |
| (५) | भटक्या जमाती (क) (एन्टी - सी ) | ३.५ |
| (६) | भटकया जमाती (ड) (एन्टी - डी) (वंजार, वंजारी, वंजारा) | ०२ |
| (७) | इतर मागास वर्गीय (ओबीसी) | १९ |

| अ. क्र. | विशेष आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| (१०) | स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्य (एफ्एफ्) | २ |
| (११) | दिव्यांग (अपंग) (कमी दिसणे, कमी ऐकणे, चालणे व्यंगत्व किंवा मणक्याचे व्यंगत्व) (पीएच) | ५ |
| (१२) | आजी व माजी सैनिकांची मुले (डीपी) | २ |
| (१३) | प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची मुले. (पीएपी) महाराष्ट्र प्रकल्प पुनर्वसन अधिनियम, १९७६ प्रमाणे प्रकल्पपीडित. | ४ |
| (१४) | शेतकरी व विहित किमान अर्हता असलेले किंवा कृषीविषयक अनुभव असलेली शेतक-यांची मुले. (अेजी) | ६ |
| (१५) | महिला | ३० |
| (१६) | अनाथ मुले | १ |

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| (८) | सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (एसईबीसी) | १० |

**इतर**

| | | |
|---|---|---|
| (९) | आर्थिक दुर्बल घटक (इडब्ल्युएस) | १० |
| | एकूण | ७० |

| अ. क्र. | विशेष आरक्षण | टक्केवारी |
|---|---|---|
| (१७) | ज्या तारखेला प्रवेश मागितला असेल त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या १० वर्षे मुदतीमध्ये किमान तीन वर्षे ज्या व्यक्ती व ज्याच्या आईवडिलांनी या राज्यात निवास केलेला नसेल, अशा व्यक्ती. (ओएस) | २ |

**टीप-**

(१) अ.क्र. १० ते १५ हे आरक्षण खुला व आरक्षण प्रवर्गामध्ये गुणवत्तेनुसार समाविष्ट राहतील.

(२) अनाथांसाठी आरक्षित जागेवर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गात करण्यात येईल.

(३) इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. १५ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६/३/१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल. प्रस्तुत शासन परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(४) 'विशेष मागास प्रवर्गीय' उमेदवारांची जात, सुरुवातीस ज्या 'इतर मागास प्रवर्गा'मध्ये समाविष्ट होती, त्या 'इतर मागास प्रवर्गा'च्या आरक्षणासाठी असा उमेदवार पात्र समजण्यात येईल.

(५) घटनात्मक आरक्षणाबाबतचे प्रचलित नियम व अन्य आरक्षणे विनाअनुदानित महाविद्यालयांना लागू आहेत.

(६) शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. पंदेकृवि-१००७/प्र.क्र.१६७७/७-अे, दि.४/१२/२००८ अन्वये **कृषी महाविद्यालय, सोनापूर जि.गडचिरोली येथे ८० टक्के जागा आदिवासी उमेदवारांसाठी राखीव आहेत.** याचप्रमाणे **कृषी महाविद्यालय, नंदूरबार** येथे जागांच्या आरक्षणाची तरतूद आहे. सदरच्या जागा अंतिम गुणवत्ता यादीतील उमेदवारांतून गुणवत्तेने भरण्यात येतील.

(७) जागांचे वाटप महाविद्यालयनिहाय करण्यात येईल.

(८) प्रवेश प्रक्रियेदरम्यान एखाद्या आरक्षित संवर्गामध्ये उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर जागा शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७ अे, दि.२०/१०/२०११ मधील कार्यपध्दतीप्रमाणे भरण्यात येतील. सदर शासन निर्णयामध्ये आरक्षित जागांची सरमिसळ करण्याची कार्यपध्दती नमूद करण्यात आलेली आहे. यानुसार आरक्षित जागांची सरमिसळ केल्यानंतर या एकत्रित जागांना 'आरक्षित रूपांतरीत' (Convert to Reserve) (CR) संबोधण्यात येईल. या जागांवर सर्व सामाजिक आरक्षित प्रवर्गातील उमेदवार पात्र असतील. आरक्षित रूपांतरीत जागांवर उमेदवार प्राप्त न झाल्यास अशा जागा खुल्या वर्गासाठी रूपांतरीत करण्यात येतात. या जागांना 'खुला रूपांतरीत' (Convert to Open) (CO) संबोधण्यात येईल. या जागांवर महाराष्ट्रातील सर्व उमेदवार पात्र असतील.

(९) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी खुल्या प्रवर्गातील जागा आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतर्गत उमेदवार प्राप्त न झाल्यास सदर जागा खुल्या प्रवर्गात रुपांतरीत करण्यात येतील.

(१०) सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम १६ दि.२६/२/२०२४, महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अन्वये अल्पसंख्यांक संस्थांव्यतिरिक्त इतर शैक्षणिक संस्था तसेच खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाच्या एकूण जागांमध्ये १० टक्के जागा सामाजिक आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्गांकरिता स्वतंत्रपणे राखून ठेवण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर आरक्षण हे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या रिट याचिका क्र.३४६८/२०२४ व इतर मधील भविष्यातील निर्णयास अधीन राहील.

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे वरील आरक्षणाची अंमलबजावणी तथा बदल करण्यात येतील.

**६. शिक्षण पध्दती :**

- राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये 'विषय - अधिभार पध्दती'ने प्रत्येक शैक्षणिक वर्ष दोन सत्रांमध्ये विभागले आहे आणि २० आठवडयांपेक्षा कमी कालावधी नसलेल्या कालावधीस 'षण्मासिक सत्र' असे म्हणतात.

- शैक्षणिक कार्यक्रमामध्ये शिकविले जाणारे विषय निरनिराळया सत्रांमध्ये विभागले जाऊन वर्गातील व्याख्यान, प्रात्याक्षिके / शेतावरील प्रात्यक्षिके, ग्रंथालयातील वाचन व गृहपाठ इत्यादीप्रकारे शिकविले जातात.
- विद्यार्थी / विद्यार्थिनी, विषयाची निवड, घ्यावयाचे एकूण अधिभार, विद्यार्थ्याच्या सल्ला समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रचलित नियमाप्रमाणे आणि विद्यार्थ्यांची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती पाहून करतो / करते.
- विद्यार्थ्याची / विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती समाधानकारक नसेल तर तो काही विषय ज्या वेळी शिकविण्यासाठी उपलब्ध असतील त्या वेळी पुन्हा घेऊ शकतो / शकते.
- पाचव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशीप्रमाणे विविध पदवी अभ्यासक्रमातील प्रवेशित उमेदवारांना सातव्या व आठव्या सत्रामध्ये 'विद्यार्थी ग्रामीण व उद्योजकता जागरुकता योजनेचा अभ्यासक्रम' पूर्ण करावा लागेल.

  अंमलबजावणीची पध्दतीः- कार्यानुभाधिष्ठीत शिक्षण / Hands on training, कौशल्यविकास प्रशिक्षण, ग्रामीण कृषी कार्यानुभव, रोपण प्रशिक्षण / औद्योगिक आवड, विद्यार्थी प्रकल्प.
- लेखी व प्रात्याक्षिक परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० टक्के गुण अनिवार्य आहेत. तथापि, त्या त्या विषयाच्या लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये प्रत्येकी किमान ४० टक्के गुण उत्तीर्णतेसाठी अनिवार्य आहेत.
- पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यास १ वर्ष अतिरिक्त कालावधी वाढवून द्यावयाचा झाल्यास विद्यार्थ्याच्या गंभीर कारणाबाबत शहानिशा करून संबंधित कृषी विद्यापीठाच्या विद्या परिषदेकडून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. अशी कालमर्यादा वाढवून दिलेल्या विद्यार्थ्यास वसतीगृह सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार नाही. जागा रिक्त असल्यास देण्यात येईल.
- शैक्षणिक नियमावलीमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल करून सुधारीत शैक्षणिक नियमावली तयार करण्यात येते. सुधारीत शैक्षणिक नियमावली शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना लागू असते.
- भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीने शिफारशीत केलेले नियम प्रवेशित विद्यार्थ्यांना लागू राहतील.

## ७. नोंदणी

प्रवेश अर्ज आणि मूळ प्रमाणपत्रे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी तपासल्यानंतर विद्यार्थ्यास नोंदणी करण्यासाठी परवानगी देण्यात येते आणि सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांचे कार्यालयात विद्यार्थी शुल्क भरतात .

## ८. वैद्यकीय तपासणी

- ❖ प्रथम वर्षात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यास विद्यापीठ / सहयोगी अधिष्ठाता यांचे निर्देशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक / ग्रामीण वैद्यकीय अधिकारी / प्राथमिक स्वास्थ्य केंद्र यांच्याकडून पहिले सत्र संपण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी करून घेणे अनिवार्य आहे.
- ❖ वैद्यकीय तपासणीत विद्यार्थ्यामध्ये व्यंग आढळून आल्यास महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता संबंधित विद्यार्थ्यास आणि त्याच्या आई - वडील / पालक यांना वैद्यकीय सुधारणेसाठी कळवतील.
- ❖ **विद्यार्थी वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरल्यास त्यास विद्यापीठातून काढून टाकण्यात येईल.**
- ❖ अशी प्रकरणे कुलसचिव यांना पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येतील.
- ❖ विद्यापीठ/ सहयोगी अधिष्ठाता यांनी आयोजित केलेल्या वैद्यकीय तपासणीसाठी विद्यार्थी गैरहजर राहिल्यास विद्यार्थ्याला स्वखर्चाने प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करुन तपासणी अहवाल विहित केलेल्या मुदतीमध्ये महाविद्यालयास सुपूर्द करावा लागेल.
- ❖ **एखाद्या विद्यार्थ्याने वैद्यकीय तपासणी अहवाल विहित मुदतीत सादर केला नाही, तर अशा विद्यार्थ्याचा निकाल घोषित केला जाणार नाही.**

## ९. विद्यार्थी मार्गदर्शन पध्दत

सर्व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना शैक्षणिक तथा इतर कार्यासंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशन पध्दत अवलंबिली जाते. यामुळे त्याचा वैयक्तिक विकास होतो. विद्यार्थ्याचा समुपदेशक (पाल्य प्राध्यापक) विद्यार्थ्याच्या प्रगती विषयी जागरुक असतो.

## १०. उपस्थिती

- ❖ प्रत्येक विद्यार्थ्यास वर्गात, प्रात्यक्षिक , ग्रंथालयातील काम, विस्तार शिक्षण संबंधी भेटी, शैक्षणिक सहली आणि प्राध्यापक व संबंधीत शिक्षक यांच्या बैठकीस हजर राहाणे आवश्यक आहे.

❖ **एखाद्या विद्यार्थ्याची हजेरी ८० टक्यापेक्षा कमी असल्यास त्याला त्या सत्राची परीक्षा देण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल** व त्या विषयात अनुत्तीर्ण असा शेरा दिला जाईल (एफ् ग्रेड).

❖ अशा विद्यार्थ्यास त्या विषयासाठी पुन्हा नोंदणी करावी लागेल.

## ११. शैक्षणिक सहल.

पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महाविद्यालयात निधी उपलब्ध झाल्यास, खालील प्रमाणे शैक्षणिक सहली आयोजित करण्यात येतात.

(१) व्दितीय वर्ष - महाराष्ट्र राज्य

(२) तृतीय वर्ष - दक्षिण भारत

(३) चतुर्थ वर्ष - उत्तर भारत

## १२. खेळ आणि इतर कार्यक्रम.

प्रत्येक महाविद्यालयात क्रीडा आणि त्यासंबंधी कार्यक्रम राबविण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

## १३. वसतीगृह

काही मर्यादित संख्येपर्यंत विद्यार्थ्यांसाठी काही महाविद्यालयांमध्ये वसतीगृहाची सुविधा गुणवत्तेच्या आधारावर उपलब्ध आहे. घटक महाविद्यालयात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्याला वसतिगृहाची सोय उपलब्ध करुन देणे बंधनकारक किंवा आश्वासित नाही.

## १४. पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके.

निरनिराळया पदवी परीक्षांमधील उच्चतम गुणवत्ताधारक पदवी विद्यार्थ्यांना कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने नियमानुसार पदके, नगदी बक्षीसे आणि पारितोषिके देण्यात येतात.

## १५. शिष्यवृत्ती आणि सवलती.

समाजकल्याण विभाग / आदिवासी विकास विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग / कृषी व पदुम विभाग व इतर संबंधित विभाग यांच्याकडून वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णयाप्रमाणे शिष्यवृत्ती आणि सवलतीचे धोरण लागू असेल. महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीद्वारे तसेच संस्थास्तरीय कोटयातील प्रवेशित उमेदवारांना कोणत्याही शिष्यवृत्ती लागू असणार नाहीत.

**शिष्यवृत्तीसंदर्भात ठळक सूचनाः-**

- प्रवेश निश्चित झालेल्या अनुसूचित जाती व विविध मागास प्रवर्गातील तसेच आर्थिक मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी राज्य शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्या / फ्रिशिप इत्यादी योजनांकरिता राज्य शासनाच्या https:/mahadbt.maharashtra.gov.in/ या पोर्टलवर जाऊन योजनेच्या निकषानुसार ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत करणे आवश्यक आहे.

ऑनलाईन शिष्यवृत्या / फ्रिशिप करिता विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेद्वारे निर्धारित केलेल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी अंतिम प्रवेश घेतलेल्या तारखेपासून पुढील एक महिन्याच्या आत महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्या / फ्रिशिप इत्यादीकरिता परिपूर्ण अर्ज करणे आवश्यक आहे.

## १६. वर्तणूक आणि शिस्त

(१) विद्यापीठामध्ये वेळोवेळी सुधारित व अस्तित्वात असलेल्या नियम व विनियमानुसार कॉपी प्रकरणे आणि गैरवर्तणुकीची प्रकरणे हाताळली जातात.

(२) विद्यापीठ संवैधानिक नियमावली, १९९० मध्ये केलेल्या तरतुदीन्वये **महाविद्यालयातील विद्यार्थी, रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास त्या महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य पूर्वसूचना न देता महाविद्यालयातून तसेच वसतिगृहातून ताबडतोब निलंबित करतील** आणि अशा विद्यार्थ्यास उप महासंचालक (शिक्षण), पत्र क्र. ६(२३)/२००७ ए व पी. दि.१८/१/०८ नुसार **मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी विशेष याचिका अपील (सी) (सन २००४ चे (सी) [२४२९५ व २४२९६-९९] मध्ये दि. १०/१२/२००१ रोजी दिलेले आदेश** आणि डॉ.राघवन समितीच्या अहवालाच्या आधारे (डी.क्र. ३७०/०४/XI-अे, दि.२६/०२/२००९) व कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र क्र. अेजीयु-२००९/प्र.क्र.५८/७-अे, दि.६/५/२००९ नुसार, **माननीय कुलगुरु यांच्या आदेशाप्रमाणे महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.**

(३) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने केलेल्या नियम व विनियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहील.

(४) **कोणत्याहीप्रकारची बेशिस्त किंवा गैरवर्तणूक ही रॅगिंगविरोधी कायदा, १९९९ च्या तरतुदीनुसार शिक्षापात्र गुन्हा ठरते.**

(५) रॅगिंगविरोधी कायदा : रॅगिंगच्या प्रकरणामध्ये २४ X ७ रॅगिंगविरोधी कायदेशीर मदत मिळण्यासाठी **१८००-१८०-५५२२** या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. ई-मेलः'**helpline@antiragging.net'** आणि संकेतस्थळ : '**http://www.ugc.ac.in**'

(६) प्रत्येक विद्यार्थी आणि त्याचे आई-वडील / पालक यांनी 'रॅगिंग विरोधी कायदा, १९९९ मधील तरतुदींचे आम्ही पालन करू,' असे **'परिशिष्ट एल'** येथील हमीपत्र देणे गरजेचे आहे. तसेच

आम्ही शैक्षणिक संस्थांमध्ये वसतीगृह परिसर आणि विद्यापीठ परिसरामध्ये शिस्त व वर्तणूक चांगली ठेऊ अशीदेखील खात्री देणे आवश्यक आहे.

## १७. शैक्षणिक शुल्क

### १७.१ शासकीय / अनुदानित महाविद्यालयातील कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी भरावयाच्या शैक्षणिक शुल्काचा तपशील (रुपयांमध्ये)

| अ. क्र. | बाब | पदवीचे द्वितीय वर्ष | |
|---|---|---|---|
| | | तिसरे सत्र | चौथे सत्र |
| | **अ) महाविद्यालय शुल्क** | | |
| १ | घटक व अनुदानित महाविद्यालयांसाठी शिक्षण शुल्क | ६००० | ६००० |
| २ | नोंदणी शुल्क | ४०० | ४०० |
| ३ | पात्रता शुल्क # | ४००<br>८०० ⊗ | -- |
| ४ | महाविद्यालय तारण धन (caution money) | २०००© | -- |
| ५ | ग्रथांलय शुल्क | ८०० | ८०० |
| ६ | विद्यार्थी परिषदेच्या विविध बाबींसाठीची वर्गणी | | |
| | एक) खेळ, जिमखाना व इतर गतीविधी | १००० | १००० |
| | दोन) विद्यार्थी सहकारी संस्था (भांग भांडवल +सभासद शुल्क) | २०० # | -- |
| | तीन) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ | ४०० | -- |
| | चार) महाविद्यालय नियतकालिक | ४०० | -- |
| | पाच) अश्वमेध क्रीडा शुल्क | ५० | -- |
| ७ | विद्यापीठ वैद्यकीय तपासणी शुल्क | २०० | -- |
| ८ | ओळखपत्र | १०० # | -- |
| ९ | विद्यार्थी सहायता निधी | २०० # | -- |
| १० | श्रेणी पत्रिका शुल्क | २०० | २०० |
| ११ | परीक्षा शुल्क | ३२०० | - |
| १२ | विद्यार्थी सुरक्षा विमा हप्ता | १०० | -- |
| | एकूण (अ) | १५६५० +<br>[४०० ⊗] | ८४०० |
| | **(ब) वसतिगृह** | | |
| १ | वसतिगृह हमी अनामत | ३०००© | -- |
| २ | देखभाल खर्च | ३००० | ३००० |
| ३ | विद्युत आकार | ३००० | ३००० |
| ४ | खाणावळ अनामत रक्कम | २०००© | -- |
| | एकूण (ब) | ११००० | ६००० |
| | एकूण (अ+ब) | २६६५० +<br>[४०० ⊗] | १४४०० |

⊗ पात्रता परीक्षा महाराष्ट्र राज्याबाहेरून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी भरावयाचे शुल्क.

© विद्यार्थ्यांनी महाविद्यालय / वसतीगृह सोडतांनाचे परतावा शुल्क.

\# हे शुल्क विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन काळात एकदाच भरावयाचे आहे. हे शुल्क RAWE / RHWE / RFWE / FIRWE इत्यादी उन्हाळी प्रशिक्षण किंवा कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आकारले जाणार नाही.

**टीप-**

१. गुणपत्रिका / परीक्षा शुल्क संबंधित विद्यापीठात जमा करावे.

२. एकत्रित श्रेणीपत्रक / गुणपत्रक शुल्क आठव्या सत्राच्या नोंदणीच्या वेळी ज्या त्या विद्यापीठाकडे जमा करावे लागेल.

३. महाराष्ट्र शासनाच्या सवलतीच्या नियमाप्रमाणे विद्यार्थीनी आणि राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सवलती या राज्य शासनाच्या वेळोवेळी सुधारित केलेल्या नियमाप्रमाणे दिल्या जातील.

४. विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास संबंधित विषयाकरिता संपूर्ण वार्षिक परीक्षा शुल्क न आकारता संबंधित विषयापुरतेच परीक्षा शुल्क आकारण्यात येईल.

५. विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजूर न झाल्यास विद्यार्थ्याने पूर्ण शुल्क भरणे बंधनकारक राहील.

## १८. प्रवेश कार्यक्रम

पदवी प्रवेश प्रक्रियेचे सन २०२४-२५ साठीचे वेळापत्रक.

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रवेश प्रक्रियेस सुरुवात दिनांक | २६-०६-२०२४ |
| २ | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबत आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | ०५-०७-२०२४ |
| ३ | अंतरिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | ०८-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| ४ | ऑनलाईन तक्रार नोंदणीचा कालावधी | ०९-०७-२०२४ ते ११-०७-२०२४ |

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| ५ | विचारात घेण्यात आलेल्या तक्रारींच्या यादीची प्रसिध्दी | १२-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| ६ | अंतिम गुणवत्ता यादीची प्रसिध्दी. | १३-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| ७ | पहिल्या प्रवेश फेरीकरिता महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम देणे | १४-०७-२०२४ |
| ८ | (i) पहिल्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी. | १६-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी | १७-०७-२०२४ ते १९-०७-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) |
| | (iii) महाविद्यालयनिहाय व प्रवर्गनिहाय शेवटच्या प्रवेशित गुणांचा तपशील (last merit / cutt off) व रिक्त जागांची प्रसिध्दी | २०-०७-२०२४ |
| ९ | दुसऱ्या प्रवेश फेरीकरिता महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम देणे | २१-०७-२०२४ |
| १० | (i) दुसऱ्या प्रवेश फेरीच्या वाटप यादीची प्रसिध्दी (रूपांतरासह) | २३-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) |
| | (ii) रिपोर्टिंगचा कालावधी<br>आणि<br>'ऑनलाईन प्रवेश वाटप फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप निश्चित झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क भरण्याचा कालावधी. (सूचनाः- ज्या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, जात / जमाती पडताळणी प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र हया प्रमाणपत्रांच्या ऐवजी पावती अपलोड केलेली असेल, अशा उमेदवारांनी या कालावधीत सदरचे मूळ प्रमाणपत्र त्यांच्या लॉगइनद्वारे अपलोड करावे. तसेच उमेदवारास प्रवेशाचे वाटप झालेले असल्यास संबंधित उमेदवाराने महाविद्यालयातसुध्दा सदरचे प्रमाणपत्र जमा करावे.) | २४-०७-२०२४ ते २६-०७-२०२४ (सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.००) |
| ११ | 'केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरी'साठी उपलब्ध जागांचा तपशील व महाविद्यालयनिहाय व प्रवर्गनिहाय शेवटच्या प्रवेशित गुणांच्या तपशीलाची (last merit / cutt off) प्रसिध्दी | २७-०७-२०२४ (सायं.५.३० नंतर) |

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १२ | रिक्त जागांकरिता ‘केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरी’ (**परिशिष्ट ‘जी’** मध्ये नमूद करण्यात आलेल्या ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रा’वर व **परिशिष्ट ‘एच’** येथील कार्यपध्दतीनुसार) | २९-०७-२०२४ |
| १३ | **महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी (परिशिष्ट ‘आय’ मध्ये नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार)** | ३०-०७-२०२४ ते ३१-०७-२०२४ |
| १४ | प्रवेश प्रक्रियेसाठीचा अंतिम दिनांक | ३१-०७-२०२४ |

**टीप -**

(१) **रविवारी तसेच शासकीय सुटीच्या दिवशी महाविद्यालयस्तरावर प्रवेश प्रक्रियाविषयक कार्यवाही चालू राहील.**

(२) वर अधिसूचित केल्याप्रमाणे **प्रवेश प्रक्रियेकरिता वेगळे मुलाखत पत्र देण्यात येणार नाही.**

या माहिती पुस्तिकेमध्ये कृषी पदवी प्रवेशाचे नियम तसेच शैक्षणिक नियमावलीच्या सर्व अभ्यासक्रमाची थोडक्यात माहिती देण्यात आलेली आहे. सविस्तर माहितीसाठी प्रवेशाचे नियम व विनियम पहावेत.

**१९. संकेतस्थळांवर प्रवेश प्रक्रियाविषयक बाबी दि. २६/०६/२०२४ रोजी सकाळी ९.०० पासून कार्यरत राहतील.**

**(रावसाहेब भागडे)** भा प्र से
**महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद तथा**
**सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण**

## प्रवेशाकरिता महाविद्यालयस्तरावर तपासावयाच्या कागदपत्रांची सूची (Check List)

| अ. क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील | आहे (✓) / नाही (×) |
|---|---|---|
| (१) | **महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याने दिलेले अधिवास प्रमाणपत्र किंवा जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले, महाविद्यालय / शाळा / कृषी तंत्रनिकेतन सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सक्षम प्रधिका-याकडील जन्म दाखला.** | |
| (२) | **कृषी तंत्रनिकेतन पदविका (इंग्रजी माध्यम) प्रमाणपत्र, गुणपत्रक** किंवा गुणविवरणपत्र. | |
| (३) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचे (एस्एस्सी- इ.१० वी) गुणपत्रक किंवा गुणविवरणपत्र. (**गुणपत्रकामध्ये टक्केवारी नमूद नसल्यास, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीने गुणपत्रकातील टक्केवारीचे पत्र.)** | |
| (४) | **(अ) कृषी तंत्रनिकेतन सोडल्याचे प्रमाणपत्र** किंवा जेथे प्रवेश अगोदर मिळालेला आहे त्या महाविद्यालयाचे **बोनाफाईड** प्रमाणपत्र. | |
| | (ब) मागील शैक्षणिक वर्षात राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत पदवी शिक्षण घेत असलेल्या उमेदवारांसंदर्भात, चालू शैक्षणिक वर्षासाठी द्वितीय वर्षात प्रवेश घेण्याकरिता चालू शैक्षणिक वर्षापूर्वी प्रवेश घेतलेल्या **संबंधित महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.** | |
| (५) | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र. | |
| (६) | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग या उमेदवारांचे **जात वैधता प्रमाणपत्र** | |
| (७) | विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, क, ड, इतर मागासवर्गीय जाती, विशेष मागास मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील उमेदवारांसाठी दिनांक ३१ मार्च,२०२५ पर्यंत ग्राह्य असलेले सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| (८) | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांच्या पात्रतेसाठी महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/ प्र.क्र.३१ /१६-अ, **दि.३१/५/२०२१** अनुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचे चालू शैक्षणिक वर्षासाठी ग्राह्य असलेले प्रमाणपत्र. | |
| (९) | (अ) मा.पंतप्रधान / मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची स्वाक्षरी असलेले अर्जदाराच्या माता / पिता / आजी / आजोबा यांचे **'स्वातंत्र्य सैनिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र'.** | |
| | (ब) **'उमेदवार** स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा/मुलीचा मुलगा/मुलगी आहे' **अशा आशयाचे स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती / पत्नीचे रु.१००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र.** | |
| (१०) | **संरक्षण दलातील कर्मचारी** असल्याबाबतचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे प्रमाणपत्र किंवा रेजिमेंटच्या समादेशक अधिकाऱ्याचे **प्रमाणपत्र** किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचे 'सैनिक' असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | |

| अ. क्र. | **प्रमाणपत्र / कागदपत्रांचा तपशील** | **आहे (✓) / नाही (×)** |
|---|---|---|
| (११) | सक्षम जिल्हा शल्य चिकित्सक किंवा समतुल्य शासकीय रूग्णालय / वैद्यकीय मंडळाचे **'शारीरिक दिव्यांगाचे प्रमाणपत्र.'** [**विकलांगतेची टक्केवारी** शारिरीकदृष्टया दिव्यांग प्रवर्गाकरिता आरक्षण मागणाऱ्या विद्यार्थ्याच्या बाबतीत, **४० टक्क्यांपेक्षा कमी असता कामा नये.**] | |
| (१२) | लाभार्थ्यांच्या नावे असणारी, विद्यार्थ्याच्या / विद्यार्थीनीच्या माता पित्याची अथवा आजोबा-आजीची जमीन कृषी विद्यापीठ / पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प यासाठी शासनाने संपादित केली असल्याचे विहित नमुन्यातील महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्याने / किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने (प्राधिकृत केले असल्यास प्राधिकृत करण्यात आले असल्याच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पत्रासह) **'प्रकल्प विस्थापित व्यक्तीकरिता दिलेले प्रमाणपत्र (पीएपी.)'.** | |
| (१३) | उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिका-याचे विहित नमुन्यातील / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील सन **२०२२-२३ किंवा २०२३-२४** या वर्षातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'.** | |
| (१४) | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाचे **'ना हरकत प्रमाणपत्र'.** | |
| (१५) | स्वच्छताविषयक सुविधांबाबत **परिशिष्ट 'एफ'** मधील हमीपत्र. | |
| (१६) | संकेतस्थळावर अपलोड केलेल्या मूळ प्रतींच्या सत्यतेबाबत **परिशिष्ट 'डी'** मधील स्वयंघोषणा पत्र. | |
| (१७) | महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दि. २३/८/२०२१ अन्वये विभागीय उपायुक्त (महिला व बालविकास) यांच्या छापील लेटर हेडवरील विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्या स्वाक्षरीचे विहित नमुन्यातील (''अ'' / ''ब'' / ''क'' प्रवर्गातील) अनाथ प्रमाणपत्र. | |
| (१८) | अल्पसंख्यांक कोटयातून प्रवेशासाठी अल्पसंख्यांक उमेदवाराचे धार्मिक / भाषिक स्वयंघोषणा प्रमाणपत्र. (**परिशिष्ट- 'सी'**) | |

## परिशिष्ट ‘अे’

### शेतकरी असल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना

( हे प्रमाणपत्र नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ अधिका-याच्या स्वाक्षरीचे नसावे)

प्रमाणित करण्यात येते की, श्री. /श्रीमती.................................................................. (जमीन धारकाचे नांव) राहणार................. तालुका.................. जि. ........................ हे श्री./कु. ............................................................ (विद्यार्थ्याचे नाव) यांचे/हिचे वडील/ आई /आजोबा /आजी (वडिलांकडून) असून श्री/श्रीमती................................................ यांच्या नांवे ............ हे. ...........आर इतकी शेतजमीन आहे. ही जमीन ........................................... अधिनियम,* १९............ चे कलम ............. मधील तरतुदीनुसार कमाल धारणेपेक्षा अधिक नाही. असेही प्रमाणित करण्यात येते की, त्यांचे उत्पन्नांचे मुख्य साधन त्यांच्या नांवे असलेल्या शेतजमिनीतून आहे.

ठिकाण -<br>
दिनांक -

कार्यालयीन मोहर

स्वाक्षरी<br>
नांव<br>
पदनाम

..................................................................................................................................................

**टीप**

(१) * येथे संबंधित अधिनियमाचे पूर्ण नाव द्यावे.

(२) स्वाक्षरी व कार्यालयीन मोहर ही अधिकृत अधिका-याचीच असावी.

(३) ‘शेतकरी’ म्हणजे अशी व्यक्ती की, जिच्या नावे असलेली शेतजमीन संबंधित महसुली विभागाच्या जमीन अधिनियमानुसार कमाल धारणेपेक्षा अधिक नाही.

(४) विद्यार्थी स्वतः जमीन मालक असल्यास जमीनधारकाचे नांव त्याचेच राहील.

**परिशिष्ट 'बी'**

**महाराष्ट्र शासन**

प्रमाणपत्र क्र.

फोटो

**वर्ष .............. करिता ग्राह्य**
**आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठी प्रमाणपत्र**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो / ४०१९ प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक ३१/०५/२०२१ अन्वये (आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी विहित केलेल्या १० टक्के आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कुमारी ...................................................... श्री/श्रीमती .................................................. यांचा/यांची मुलगा/मुलगी गाव/शहर .............. तालुका .................... जिल्हा/विभाग ................................ महाराष्ट्र चे रहिवासी आहेत. तो/ती ................................... जातीचे असून जात/पोटजात/वर्ग चे असून सदर जात महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (वि.जा.), भटक्या जमाती (भ.ज.), विशेष मागास प्रवर्ग (वि.मा.प्र.) आणि इतर मागासवर्ग (इ.मा.व.) यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ) यामध्ये नमूद केलेल्या प्रवर्गांतर्गत होत नाही.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६ अ, दिनांक १२/०२/२०१९ अन्वये त्याच्या/तिच्या कुटुंबाचे सर्व स्त्रोतांचे वर्ष .............. मधील एकत्रित वार्षिक उत्पन्न रू. ............/- असून, सदर उत्पन्न रू.८,००,०००/- पेक्षा कमी आहे. त्यामुळे असे प्रमाणित करण्यात येत आहे की, तो/ती यांचा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकामध्ये समावेश होतो.

ठिकाण :

दिनांक : स्वाक्षरी :

नाव :

पदनाम :

हे प्रमाणपत्र अर्जकर्त्याने सादर केलेल्या खालील कागदपत्र/पुरावे यांच्या आधारावर निर्गमित करण्यात येत आहे.

१.

२.

३.

# <u>परिशिष्ट ‘सी ’</u>

## <u>‘अल्पसंख्यांक उमेदवाराचे स्वयंघोषणापत्र ’</u>

मी नाव श्री./ कु. /श्रीमती ........... ............ .......... ........... ... ...............

राहणार (पूर्ण पत्ता) ...... ........... ............... ... ........... ........... .....

........... ............... ......... ............ .......... ......... .........

याद्वारे असे घोषित करतो / करते की, मी धार्मिक (मुस्लिम) / भाषिक (उर्दु/हिंदी/गुजर) अल्पसंख्यांक आहे.

माझी उमेदवारी भाषिक अल्पसंख्यांक अंतर्गत ठरविण्याकरिता माझ्या शाळा / महाविद्यालय सोडल्याचा दाखल्यावर माझ्या मातृभाषेचा उल्लेख नसल्यामुळे मी प्रमाणित करतो की, माझी मातृभाषा, उर्दु / हिंदी / गुजर आहे.

मी असे प्रमाणित करतो की, शासन निर्णय, अल्पसंख्यांक विभाग क्र. एव्हीव्ही-२०१०सी. क्र.१०९/१० डेस्क-५, दि. १/७/२०१३ नुसार अल्पसंख्यांक समाजाच्या दाव्याकरिता आवश्यक असलेली संबंधित कागदपत्रे, प्रवेश मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी दाखल करेल.

दिनांकः स्वाक्षरी ..................................

ठिकाणः नाव- ...................................

---

टिपः- भाषिक (हिंदी / गुजर) जे आवश्यक नसेल ते खोडावे.

## ‘परिशिष्ट डी ’

## ‘मूळ प्रतींविषयी स्वयं घोषणापत्र’

अर्जदाराचा फोटो

मी ........................................ श्री. ................................. यांचा मुलगा / मुलगी वय ............ वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) .............. व्यवसाय ................ राहणार ................. याद्वारे घोषित करतो / करते की, मी संकेतस्थळावर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती खऱ्या आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :- ............... अर्जदाराची सही ......................

दिनांक :- ............... अर्जदाराचे नावः.......................

## ‘परिशिष्ट ई ’

## ' उमेदवारांसाठी महत्वाच्या सूचना'

(१) प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी agripug2024.mahacet.org या संकेतस्थळावर **'Application Flow Chart'** या शिर्षाद्वारे दर्शविण्यात आलेल्या प्रवेश पध्दतीच्या टप्प्यांचे अवलोकन करावे.

(२) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतांना मूळ कागदपत्रांच्या आधारे उमेदवारांने योग्य माहिती प्रवेश अर्जात द्यावी. चुकीची माहिती दिल्यास अशा चुकीच्या माहितीच्या आधारे झालेले प्रवेशाचे वाटप फेटाळण्यात येईल.

(३) प्रवेश माहिती पुस्तिकेमधील मुद्दा क्र. १८ येथे नमूद करण्यात आलेल्या वेळापत्रकाचे नीट आकलन करावे.

(४) प्रवेश प्रक्रिया संपूर्णतः ‘ऑनलाईन’ असल्याने agripug2024.mahacet.org या संकेतस्थळावर उमेदवाराने प्रवेश अर्जाद्वारे वैयक्तिक व शैक्षणिक माहिती भरावी.

(५) संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या मूळप्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.

(६) स्कॅन करून अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.

(७) उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावे.

(८) प्रवेश अर्जामधील माहिती योग्य असल्याची, त्याप्रमाणे मूळ कागदपत्रे अपलोड केल्याची व प्रवेश शुल्क भरल्याची खातरजमा झाल्यानंतरच प्रवेश अर्ज दाखल करण्याचे बटन दाबावे. एकवेळा दाखल झालेल्या प्रवेश अर्जामध्ये दुरस्त्या / सुधारणा करता येणार नाहीत. तसेच एका उमेदवारास एकापेक्षा जास्त अर्ज दाखल करता येणार नाहीत. याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

(९) (अ) अंतरिम गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर आपले नाव, प्रवर्ग, गुण इत्यादी माहिती अचूक आहे, याची प्रत्येक उमेदवाराने संकेतस्थळाद्वारे खातरजमा करावी.

(ब) माहितीमध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्यास, पुराव्यादाखल कागदपत्राचे स्कॅन करून अशा स्कॅन कागदपत्रांसह वेळापत्रकात दिलेल्या मुदतीमध्ये उमेदवाराने आपल्या 'लॉग-इन आय्डी' व 'पासवर्ड'च्या आधारे त्रुटीची ऑन लाईन पूर्तता करावी.

(१०) वेळापत्रकात नमूद केलेल्या दिनांकास प्रसिध्द केलेल्या महाविद्यालयनिहाय 'प्रवेश यादी'चे अवलोकन करावे.

(११) ज्या उमेदवारास प्रवेशाचे वाटप झालेले आहे, त्या उमेदवाराच्या लॉगइनमध्ये 'तात्पुरते प्रवेश वाटप पत्र' उपलब्ध असेल.

(१२) प्रवेशाचे वाटप झालेल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा झाल्यास उमेदवाराने लॉग-इनद्वारे तात्पुरते प्रवेश वाटप पत्राची प्रत प्राप्त करून विहित वेळेत संबंधित महाविद्यालयात आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह उपस्थित रहावे. संबंधित महाविद्यालयांकडून कागदपत्रांची तपासणी करण्यात येईल. कागदपत्रे योग्य असल्यास त्याबाबत महाविद्यालयाकडून महाविद्यालयाच्या लॉगइनमध्ये नोंद घेण्यात येईल. यानंतरच उमेदवाराच्या लॉग इनमध्ये फ्रीज / फ्लोट (प्रथम प्रवेश वाटप फेरीशी निगडित) हे विकल्प उमेदवारास उपलब्ध होतील. तसेच जागा स्वीकृती शुल्क भरण्याची सुविधा उपलब्ध होईल.

**(१३)** फ्रीज / फ्लोट / प्रवेश नाकारणे, इत्यादी प्रक्रियेसाठी प्रवेश माहिती पुस्तिकेतील 'मुद्दा क्र. ४.८ प्रवेश वाटपाची कार्यपध्दती' चे आकलन करावे व त्यानुसार प्रवेशाची प्रक्रिया करावी.

**(१४)** सर्व ऑनलाईन प्रवेश वाटप फेऱ्या संपल्यानंतर, प्रवेशाचे वाटप निश्चित झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क भरण्यासाठी वेळापत्रकात कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत उमेदवारांनी मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क जमा करावे. **ज्या उमेदवारांना शासनाकडून शुल्काची प्रतिपूर्ती होते, अशा उमेदवारांनी शुल्क भरु नये.**

(१५) उमेदवार स्वतः उपचारार्थ रूग्णालयात दाखल असल्यास व त्यास विहित मुदतीत प्रवेशासाठी उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशावेळी उमेदवाराच्या गैरहजेरीत त्यास प्रवेश मिळू शकतो. मात्र उमेदवाराने अशाप्रसंगी एखाद्या व्यक्तीस स्वतःच्या स्वाक्षरीने प्राधिकृत करणे आवश्यक आहे. प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने प्राधिकार पत्रासोबत उमेदवाराचे तात्पुरते वाटपपत्र, उमेदवाराची सर्व मूळ कागदपत्रे, संबंधित रुग्णालयाचे प्रमाणपत्र आणि आवश्यक ते शुल्क सोबत आणावे. प्राधिकार पत्राचा विहित नमुना **परिशिष्ट 'जे'** येथे देण्यात आला आहे. ही बाब, केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्यावेळी उमेदवार रूग्णालयात दाखल झालेला असल्यास त्यासाठीही लागू असेल.

**(१६)** (अ) **प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर प्रवेश रद्द करावयाचा असल्यास संबंधित महाविद्यालयाच्या सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्याकडे प्रवेश रद्द करण्याबाबत विनंती अर्ज सादर करावा.**

(ब) अशाप्रकरणी **प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१३ नुसार आवश्यक ते शुल्क भरावे तसेच मूळ कागदपत्रे महाविद्यालयाकडे जमा केलेली असल्यास ती परत घ्यावीत.**

(१७) ज्या विद्यार्थ्यांना स्वेच्छेने मरणोत्तर अवयव दान करावयाचे आहेत. त्यांनी **परिशिष्ट 'एम'** येथील 'मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज' भरून महाविद्यालयाकडे द्यावा.

(१८) शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण - १५१७ / प्र.क्र.१८५ / ६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांनी मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून प्रवेश घेतेवेळी संबंधित महाविद्यालयाकडे जमा करावे.

(१९) प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांना प्रवेश प्रक्रिया शुल्क रू.१०००/- लागू आहे.

(२०) नैसर्गिक आपत्ती किंवा तांत्रिक अडचणींमुळे प्रवेश प्रक्रियेच्या नियोजित वेळापत्रकामध्ये किंवा इतर बाबींमध्ये बदल करावे लागतात. असे बदल किंवा सुधारणांबाबतच्या सूचना वेळोवेळी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतात. याकरिता उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये संकेतस्थळावरील अद्ययावत सूचनांची माहिती घेत रहावी.

## परिशिष्ट 'एफ'

**प्रवेश घेताना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी त्यांना असणा-या स्वच्छताविषयक सवयी तसेच त्यांच्या घरी असणा-या स्वच्छता विषयक सुविधांची माहिती भरण्याचा नमुना**

| | | |
|---|---|---|
| १ | नाव | ........................................................................ |
| २ | कायम रहिवासाचा पत्ता | ........................................................................<br>........................................................................ |
| ३ | कुटुंबाची माहिती | कुटुंबातील सदस्यांची संख्या-<br>शौचालय वापर करणा-यांची संख्या- |
| ४ | शौचालयाची उपलब्धता | आहे ☐ नाही ☐<br>शौचालयाची उपलब्धता नसल्यास कारण-<br>........................................................................ |
| ५ | हात धुण्याची सवय | जेवणापूर्वी- आहे ☐ नाही ☐ |
| | | असल्यास- साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐ |
| | | शौचानंतर- आहे ☐ नाही ☐ |
| | | असल्यास- साबणाने ☐ पाण्याने ☐ इतर ☐ |
| ६ | वचननामा | शौचालयाची आवश्यकता व त्याचा सातत्याने वापर करण्याबाबतचे संस्थेने केलेले आवाहन मी वाचले व त्याबाबतचे महत्व मला मनापासून पटले आहे. मी याचे महत्व माझ्या घरातील सर्वांना समजावून सांगून **येत्या तीन महिन्यात** माझ्या घरी शौचालय बांधेन व सर्व जण त्याचा नियमित वापर करण्याचे वचन मी संस्थेस देत आहे. |

दिनांक :-

स्वाक्षरी-

## परिशिष्ट 'जी'

## केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीसाठी प्रवेश प्रक्रिया केंद्रांचा तपशील

| अ. क्र. | प्रवेश प्रक्रिया केंद्र | प्रवेश प्रक्रिया केंद्रांतर्गत महाविद्यालये |
|---|---|---|
| १. | **डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी** | अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित कृषी महाविद्यालये. |
| २. | **कृषी महाविद्यालय, अकोला ४४४ १०४.** | अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, बुलडाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित कृषी महाविद्यालये. |
| ३. | **कृषी महाविद्यालय, कृषी नगर, परभणी ४३१ ४०२.** | परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशीव, बीड, जालना व छत्रपती संभाजीनगर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित कृषी महाविद्यालये. |
| ४. | **कृषी महाविद्यालय, दापोली** | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित कृषी महाविद्यालये. |

## परिशिष्ट ‘एच’

## केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीची कार्यपध्दती

केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि. २९/०७/२०२४ रोजी प्रवेश प्रक्रिया केद्रांवर खालील कार्यपध्दतीने केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील संकेतस्थळावर दि. २७/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच प्रवेश प्रक्रिया केंद्रांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी फक्त ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर राबविण्यात येईल. कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांच्या ठिकाणी केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी राबविण्यात येणार नाही. ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर ज्या ज्या महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, त्याबाबतचा प्रवेश प्रक्रिया केंद्रनिहाय तपशील परिशिष्ट **‘जी’** मध्ये देण्यात आला आहे.

२. संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयाशी संबंधित ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रां’वर दि.२९/०७/२०२४ रोजी **सकाळी ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

३. ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रां’नी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत त्यांच्याकडे उपस्थित असलेल्या उमेदवारांची संगणकावर नोंद घ्यावी. अशा उपस्थित असलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करून संबंधित ‘प्रवेश प्रक्रिया केंद्रां’स दोन तासाच्या कालावधीत म्हणजेच दुपारी १.३० पर्यंत पुरविण्यात येईल. प्रत्येक दिवसाची स्वतंत्र गुणवत्ता यादी असेल. ही गुणवत्ता यादी फक्त त्याच दिवसासाठी ग्राह्य असेल.

४. वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, कृषी

व पदुम विभाग, क्र.मकृवि-२०१०/प्र.क्र.१५५/७अे, दि.२०/१०/२०११ मधील परिशिष्ट २ येथील प्रवेश कार्यपध्दतीनुसार उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी घ्यावी.**

५. योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे** 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी **संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावर 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'च्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

**६.** 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'नी प्रवेश देण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचा तपशील **संचालक (शिक्षण) यांच्याकडे सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी ई-मेलद्वारे कळवावा.**

७. केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीद्वारे प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'कडून तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' देण्यात येईल.

८. 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'शी संबंधित असलेल्या प्रत्येक महाविद्यालयाच्या एका प्रतिनिधीने संबंधित 'प्रवेश प्रक्रिया केंद्रां'त केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उपस्थित रहावे. या प्रतिनिधीने त्यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती कागदपत्रे व नियमानुसार प्रथम सत्राच्या शुल्काची रक्कम प्राप्त करून घ्यावी. याबाबत उमेदवारास पावती द्यावी.

९. केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या कालावधीमध्ये उमेदवाराने प्रवेश रद्द केला असल्यास किंवा इतर कारणामुळे प्रवेश रद्द केल्यास, यामुळे रिक्त झालेली जागा त्याच दिवशी संकेतस्थळावर प्रसिध्द करून विहित कार्यपध्दतीने भरण्यात यावी.

१०. प्रत्येक उमेदवाराकडून प्राप्त केलेले रू. १०००/- 'जागा स्वीकृती शुल्का' द्वारे जमा झालेली रक्कम, केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी संपल्यानंतर पाच दिवसांच्या कालावधीत महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यावर जमा करावी. यासाठी प्रत्येक महाविद्यालयाच्या लॉगइनमध्ये रक्कम जमा करण्याची सुविधा (payment gateway) उपलब्ध असेल.

## परिशिष्ट 'आय'

## महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीची कार्यपध्दती

प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीनंतरही जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि. ३०/०७/२०२४ ते ३१/०७/२०२४ (प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत) या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर प्रवेश फेरी राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील संकेतस्थळावर दि. २७/०७/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या थेट द्वितीय वर्षातील पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच संबंधित महाविद्यालयांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. प्रत्येक महाविद्यालयाच्या ठिकाणी त्या महाविद्यालयातील रिक्त जागा भरण्यासाठी महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी राबविण्यात येईल.

२. पात्र उमेदवारांनी त्यांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयाकडे अर्ज करावा व त्या महाविद्यालयात दि.३०/०७/२०२४ ते ३१/०७/२०२४ **या कालावधीत सकाळी ९.०० ते ११.०० वाजेपर्यंत** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उपस्थित राहावे.

३. उपलब्ध जागांवरील प्रवेश हे पारदर्शक रितीने आणि ज्यांनी सक्षम प्राधिकाऱ्याकडे पडताळणीसाठी व नंतर महाविद्यालयाकडे प्रवेशासाठी अर्ज सादर केलेले आहेत, अशा सर्व उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार करावेत व **महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे प्रवेश दिल्याची नोंद करावी.**

४. संस्था / महाविद्यालयाने, महाविद्यालयस्तरीय रिक्त जागा व वरीलप्रमाणे प्राप्त प्रवेश अर्जांची गुणवत्ता यादी, संस्थेच्या / महाविद्यालयाच्या सूचना फलकावर व संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करावी.

५. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया व केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधील रिक्त जागा ज्या प्रवर्गाची आहे, त्या प्रवर्गाच्या उमेदवारांमधूनच ती जागा भरण्यात यावी. तद्नंतरही जागा रिक्त राहिल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकास म्हणजेच दि.३१/०७/२०२४ रोजी विहित पध्दतीने

(शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रवेश कार्यपध्दतीने) जागा रूपांतरीत करून भरण्यात याव्यात.

६. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, जात / जमाती पडताळणी प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र ही प्रमाणपत्रे दि. २६/७/२०२४ हया मुदतीत निर्गमित झालेली असावीत. यानंतरची प्रमाणपत्रे ग्राह्य नसतील.

७. प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवाराची मूळ कागदपत्रे तपासून ते बरोबर असल्याची महाविद्यालयाने खातरजमा करावी.

८. महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांकडून रु.१०००/- 'जागा स्वीकृती शुल्क' महाविद्यालयांनी प्राप्त करावे व प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये दिलेल्या सूचनाप्रमाणे सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यावर जमा करावे.

९. महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय असणार नाही. याची माहिती महाविद्यालयांनी / संस्थांनी संबंधित प्रवेशोच्छुक उमेदवारास द्यावी. सदरील उमेद्वार शिष्यवृत्ती मागणार नाही, असे हमी पत्र उमेदवाराकडून लेखी स्वरूपात घेण्यात यावे.

१०. योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे **संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे** महाविद्यालयांनी **संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** प्रवेशाचे वाटप झालेल्या उमेदवारास संबंधित महाविद्यालयाकडून तात्पुरते 'प्रवेश वाटप पत्र' देण्यात येईल. यासाठी संकेतस्थळावर महाविद्यालयांच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

११. महाविद्यालयाने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची आवश्यक ती कागदपत्रे व नियमानुसार प्रथम सत्राच्या शुल्काची रक्कम प्राप्त करून घ्यावी. याबाबत उमेदवारास पावती द्यावी.

१२. प्रत्येक उमेदवाराकडून प्राप्त केलेले रू. १०००/- 'जागा स्वीकृती शुल्का' द्वारे जमा झालेली रक्कम, महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी संपल्यानंतर पाच दिवसांच्या कालावधीत महाविद्यालयाच्या लॉगइनद्वारे सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या खात्यावर जमा करावी. यासाठी प्रत्येक महाविद्यालयाच्या लॉगइनमध्ये रक्कम जमा करण्याची सुविधा (payment gateway) उपलब्ध असेल.

# परिशिष्ट 'जे'

## प्राधिकार पत्र

मी खाली सही करणार श्री./श्रीमती. ................................. .......................... ......... ....... प्रवेश अर्ज क्र........................, पदवी प्रवेश प्रक्रिया २०२४-२५ अंतर्गत दि..................... ते दि. ................... या कालावधीतील ............... प्रवेश वाटप फेरीद्वारे मला तात्पुरते वाटप पत्र प्राप्त झाले आहे.

मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, मला दि. ..................... पासून ...................................................................................... (रूग्णालयाचे नाव व पत्ता) या रूग्णालयामध्ये उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे आणि .............................. ....................................................... (महाविद्यालयाचे नाव व पत्ता) महाविद्यालयामध्ये सदर वाटप फेरीस उपस्थित राहण्यास मी शारीरिकदृष्टया सक्षम नाही.

यास्तव माझा / माझी ........................ (नाते) श्री. / श्रीमती ................. .................. .................. यांना वरील वाटप फेरीस उपस्थित राहण्याकरिता मी प्राधिकृत करीत आहे. त्यांनी माझ्या समक्ष खाली स्वाक्षरी केली आहे आणि त्यांच्याकडे त्यांचे छायाचित्र असलेले ओळखपत्रसुध्दा (photo identity) आहे.

आवश्यक वैद्यकीय प्रमाणपत्र, इतर कागदपत्रे व शुल्क मी त्यांच्याकडे सुपूर्द केलेले आहे.

परवानगी आणि विचार होण्यासाठी विनंती आहे.

**आपला,**

**नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीची स्वाक्षरी व नाव**

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

प्रति,

सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य,
......................................................
......................................................
......................................................

## <u>परिशिष्ट ‘के’</u>

**<u>'प्रवेश प्रक्रियेसंदर्भात महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांच्यासाठी महत्वाच्या सूचना'</u>**

(१) वाटपपत्रावर नमूद केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत उमेदवार तात्पुरते प्रवेश वाटप पत्र (Provisional Allotment Letter) घेऊन आल्यानंतर, ज्या धर्तीवर प्रवेशाचे वाटप झालेले आहे, (उदा. गुण, प्रवर्ग, कोटा इत्यादी) अशी सर्व कागदपत्रे तपासून ते बरोबर असल्याची खातरजमा झाल्यास संकेतस्थळावर तशी नोंद करावी व मूळ कागदपत्रे उमेदवारास परत करून उमेदवाराकडून सदर कागदपत्राच्या छायाप्रती ठेवून घ्याव्यात.

(२) याचबरोबर प्रवेश अर्जातील माहितीनुसार **इतरही कागदपत्रे तपासून** ती माहितीसुध्दा बरोबर असल्याची खातरजमा करावी. माहिती बरोबर नसल्यास त्रुटीविषयक माहितीची नोंद महाविद्यालयाच्या लॉगइन मध्ये करावी. त्यानुसार प्रवेश अर्जातील इतर माहिती सुधारीत करण्यात येईल.

(३) ज्या धर्तीवर प्रवेशाचे वाटप झालेले आहे, अशी कागदपत्रे, उमेदवार सादर करू न शकल्यास अशा उमेदवाराचे प्रवेश वाटप फेटाळण्यात (Reject) यावे आणि महाविद्यालयाच्या लॉग इनमध्ये प्रवेश वाटप फेटाळण्याचे कारण नमूद करावे.

(४) प्रवेशाची नोंदणी झाल्यानंतर विद्यार्थ्यास प्रवेश रद्द करावयाचा असल्यास प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ४.१३ येथे नमूद केलेल्या पध्दतीने कार्यपध्दती अवलंबावी आणि महाविद्यालयाच्या ‘लॉग इन’द्वारे नोंद करावी.

(५) उमेदवार स्वतः उपचारार्थ रूग्णालयात दाखल असल्यास व त्यास विहित मुदतीत प्रवेशासाठी उपस्थित राहणे शक्य नसल्यास अशावेळी उमेदवाराच्या गैरहजेरीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने प्राधिकृत पत्रासोबत संबंधित रुग्णालयाचे प्रमाणपत्र, तात्पुरते वाटपपत्र, आवश्यक ती मूळ कागदपत्रे व योग्य ते शुल्क सादर केल्यास उमेदवारास त्याच्या गैरहजेरीत प्रवेश देण्यात यावा. ही बाब, केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी व महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरीच्यावेळी उमेदवार रूग्णालयात दाखल झालेला असल्यास त्यासाठीही लागू असेल.

(६) ज्या विद्यार्थ्याकडून स्वेच्छेने मरणोत्तर अवयव दानविषयक **परिशिष्ट 'एम'** येथील 'मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज' प्राप्त होईल, अशा विद्यार्थ्यास महाविद्यालयाकडून देण्यात येणाऱ्या ओळखपत्रावर 'अवयवदाता' अशी नोंद करावी.

(७) ज्या उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविलेले नाही, अशा उमेदवारांचे मतदार यादीमध्ये नाव नोंदविण्याविषयी उमेदवाराकडून हमी पत्र व नमुना ६, ७, ८ व ८-अ व्यवस्थित भरून घेऊन शासन परिपत्रक, कृषी व पदुम विभाग, क्र. संकीर्ण-१५१७/प्र.क्र.१८५/६-अे, दि.५/६/२०१७ अनुसार कार्यवाही करावी.

(८) सर्व ऑनलाईन प्रवेश वाटप फेऱ्या संपल्यानंतर, प्रवेशाचे वाटप निश्चित झालेल्या उमेदवारांनी संबंधित महाविद्यालयात उपस्थित राहून मूळ कागदपत्रे व आवश्यक ते शुल्क भरण्यासाठी वेळापत्रकात कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत उमेदवारांची मूळ कागदपत्रे, आवश्यक ते शैक्षणिक शुल्क जमा करून घ्यावे. तसेच जमा केलेल्या शुल्काची पावती उमेदवारास द्यावी व प्रवेश घेतल्याबाबतची नोंद लॉग-इनद्वारे करावी. **उमेदवारांना शासनाकडून ज्या शुल्काची प्रतिपूर्ती होते, असे शुल्क उमेदवारांकडून घेण्यात येऊ नये.**

(९) प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर, प्रत्येक विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थेने / महाविद्यालयाने महासंचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे प्रवेश मान्यतेसाठी पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र.३.५ प्रमाणे प्रस्ताव सादर करावेत.

(१०) विद्यार्थ्यास वसतीगृह पाहिजे असल्यास आणि वाटप होत असल्यासच, विद्यार्थ्याकडून वसतीगृह शुल्क घेण्यात यावे अन्यथा घेण्यात येऊ नये.

(११) प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र वगळता इतर सर्व कागदपत्रे महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांना विनाविलंब परत करावीत.

<u>परिशिष्ट 'एल'</u>

**Name of Institute / College : ____________________________________________**

**<u>Undertaking from the students as per the provisions of anti-ragging</u>**
**Verdict by the Hon'ble Supreme Court**

I, Mr./Ms. ________________________________________ SR/Roll No.___________ Course _______________ Degree programme _____________________ student of _________________________________ (college name) on this day ____________ month _______________ year __________ do hereby state on solemn affirmation and undertake that-

(1) I have read and understood the directives of the Hon'ble Supreme Court of India on anti-ragging and the measures proposed to be taken in the above reference (available at http://www.hbti.ac.in); and

(2) That I understand the meaning of 'ragging' and know that the ragging in any form is a punishable offence and the same is banned by the Court of Law.

(3) I have not been found or charged for my involvement in any kind of ragging in past. However, I undertake to face disciplinary action/legal proceedings including expulsion from the Institute if the above statement is found to be untrue or the facts are concealed, at any stage in future; and

**(4) I shall not resort to ragging in any form at any place and shall abide by the rules/laws prescribed by the Courts, Government of India and the Institute authorities for the purpose from time to time.**

**Date:** **Signature of Student**

I hereby fully endorse the undertaking made by my child/ward.

**Signature of Mother/Father and or Guardian**

**Witness:**

## परिशिष्ट ‘एम’

## ‘मरणोत्तर अवयवदान संमती अर्ज ’ (ऐच्छिक)

मी नाव श्री./श्रीमती. ................................. ........... ............ ... ................ प्रवेश अर्ज क्र......................... स्वेच्छेने लिहून देतो की, माझ्या मरणोत्तर माझे अवयव दान करण्यासंबंधी मी संमती देत आहे.

ठिकाणः

दिनांकः

स्वाक्षरी ...................................

नाव- ....................................

अर्ज क्रमांक ....................................